# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील अनुसूचित जाती-जमातीच्या विकासासाठी तरतूद केलेला निधी अन्य खात्यांकडे वळविण्यात आल्याबाबत**

**(१) २३९९८ (३०-०७-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती-जमातीच्या विकासासाठी दरवर्षी अर्थसंकल्पात रू.८ ते १० हजार कोटीची तरतूद केली जाते, परंतु वर्षाअखेर उक्त तरतूद खर्च होत नसल्याची बाब सांगून इतर खात्यांकडे वळविला जात असल्यामुळे दलित आदिवासींचा विकास होत नसल्याचे दिनांक १ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तरतुद अन्यत्र खर्च केला जावू नये याकरिता दलित आदिवासींच्या संरक्षण करण्यासाठी कायदा करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय, तसेच दलित आदिवासींचा निधी इतर खात्यात वळविण्याचे कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही. राज्यातील अनुसूचित जाती-जमातीच्या विकासासाठी दरवर्षी अर्थसंकल्पीय तरतूदी त्याच घटकांच्या विकासासाठी खर्च करण्यात येतात. सदर तरतुदी इतर विभागांकडे वळविण्यात येत नाहीत.

(२) अनुसूचित जातीकरिता “अनुसूचित जाती अधिनियम” आणि अनुसूचित जमातीकरीता “महाराष्ट्र अनुसूचित जनजाती उपाययोजना (वित्तीय साधनसंपत्तीचे नियोजन, वाटप व वापर) अधिनियम, २०१६” करण्याचे प्रस्तावास तपासण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्हयात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून भूखंड वाटपात झालेला गैरव्यवहार**

**(२) २८५८४ (२२-१२-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पश्चिम विदर्भातील अमरावती व यवतमाळ येथील एमआयडीसीमध्ये वर्धेतील कुकरेजा आणि अकोल्यातील वीरवाणी नामक दलालांचे अधिक भूखंड असल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, यवतमाळ एमआयडीसीतील ७०% भूखंड पडित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दलालांनी यवतमाळ, अमरावती व मुंबईच्या एमआयडीसी कार्यालयातील अधिका-यांना मॅनेज केले असून प्रती एकर जमि नीमागे अधिका-यांची ३ लाख रुपयांची मॉर्जिन असल्याची खळबळजनक माहिती उघडकिस आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १५ रुपये चौरस फुट दर असलेल्या भुखंडासाठी केवळ मार्जीन म्हणून ७ रुपये प्रती चौरस फुट अतिरिक्त दर आकारला जातो परंतु आकारलेल्या दरांबाबत कुठेही रेकॉर्ड ठेवले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, एमआयडीसीतील भूखंडाच्या वाटपामध्ये घोटाळा करणा-या अधिका-यांवर व दलालांवर शासनाने कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

महामंडळाने यवतमाळ येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याकरिता २०५.७१ हे.आर जागा संपादित केली असून त्यावर १९१ भूखंड आरेखित करण्यात आले आहेत. त्यापैकी, १६२ भूखंडांचे वाटप करण्यंत आले असून ११५ भूखंडांवर उत्पादन सुरु आहे. विहीत कालावधीत भूखंडाचा विकास न केलेल्या एकूण २५ उद्योजकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून २ भूखंड ताब्यात घेण्यात आले आहेत.

तसेच अतिरिक्त यवतमाळ औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याकरिता महामंडळाने ४३९.८५ हे.आर जागा संपादित केली असून त्यावर २९७ भूखंड आरेखित करण्यात आले आहेत. त्यापैकी २३७ भूखंडांचे वाटप करण्यात आले असून ४५ भूखंडांवर उत्पादन सुरु आहे व १५ भूखंडांवर बांधकाम सुरु आहे. विहीत कालावधीत भूखंडाचा विकास न केलेल्या एकूण १६

उद्योजकांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

ज्या उद्योजकांनी विहीत कालावधीत भूखंडाचा विकास केला नसेल त्याना दिनांक ३१/८/२०१७ पर्यंत उद्योग संजीवनी योजनेअंतर्गत मुदतवाढ घेता येईल असे महामंडळाचे धोरण आहे. औद्योगिक क्षेत्र विकसित करताना नियमानुसार ५% जागा व्यापारी प्रयोजनासाठी, ५% जागा सुविधा क्षेत्रासाठी व १०% खुली जागा याप्रमाणे एकूण २०% टक्के जागा राखीव ठेवण्यात येते.

(३) व (४) क्षेत्रफळनिहाय व वर्गवारीनिहाय गठीत केलेल्या भूखंड वाटप समितीच्या माध्यमातून अर्जदाराने सादर केलेली कागदापत्रे, त्यांचे उद्योगाबाबतचे ज्ञान, उद्योजकता, प्रकल्प उभारणीच्या अनुषंगाने आर्थिक तरतूद इत्यादी बाबी तपासून भूखंड वाटप समितीच्या मंजूरीनंतर औद्योगिक व वाणिज्य भूखंडाचे वाटप केले जाते. भूखंड वाटप समितीमध्ये शासनाच्या विविध विभागातील अधिका-यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

(५), (६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अचलपूर मतदारसंघातील औद्योगिक क्षेत्रात भूखंडाचे वाटप पत्र आधी भरलेली रक्कम जप्त न करता पुनरुज्जीवित करणे बाबत

**(३) २८८९९ (२२-१२-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नैसर्गिक प्रकोप आणि शेतक-यांच्या वाढत्या आत्महत्या अश्या परिस्थितीत अचलपूर मतदारसंघातील शेतक-यांना दिलासा देऊन अग्रो इंडस्ट्री आनिभाव्य फूड झोन उभारण्याकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अचलपूर यांचेकडून भूखंड क्रमांक २९ (क्षेत्रफळ-८००६.७४ चौ.मी) चे वाटप पत्र माद्रीन अग्रो प्रा.ली. या कंपनीच्या नावे वितरीत करण्यात आल्यानंतर कंपनीने उर्वरित रक्कम न भरल्यामुळे हे वाटप पत्र रद्द करण्यात आले. त्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मुंबई मुख्यालयाकडून सदरची रुपये ३,१५,००० इतकी रक्कम जप्त (फोर फिट) करून नवीन प्रचलित दरानुसार कंपनीच्या भूखंडाचे वाटप पत्र पुनरुज्जी वितकरण्याचे आदेश देण्यात आले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नैसर्गिक प्रकोप आणि दुष्काळग्रस्त भागातील उद्योगधंदे उभारण्यास पुढाकार घेणाऱ्या स्थनिक शेतकरी व्यावसायिकांना शासन असा व्यापारी नियम न लावता प्रोत्साहन देण्यास तयार आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक शेतक-यांच्या माद्रीन कंपनीची रुपये ३,१५,००० इतकी रक्कम जप्त न करता एकूण रकमेत वळती करून जुन्याच दराने सदर भूखंडाचे वाटपपत्र पुनरुज्जीवित करण्याकरिता कोणती कार्यवाही करणार आहे,

(४) नसल्यास, याची कारणे आणि सामाजिक तसेच आर्थिक परिणामांची कल्पना शासनास आहे काय?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :**(१) अचलपूर विकास केंद्रातील भूखंड क्रमांक सी-२९ या ८००६.७४ चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप मे.मंदासिन ॲग्रो प्रा.लि. यांना दिनांक २१/५/२०१४ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आलेले होते तथापि कंपनीने देकारपत्रातील इसारा रकमेचा भरणा केल्यानंतर उर्वरित रक्कम महामंडळाच्या नियमानुसार एक महिन्याच्या विहीत मुदतीत किंवा १५० दिवसांच्या आत विलंब शुल्कासह महामंडळास अदा करणे आवश्यक होते. परंतु कंपनीने उर्वरित रकमेचा भरणा विहीत मुदतीत न केल्याने महामंडळाच्या नियमानुसार सदर भूखंडाचे वाटपपत्र आपोआप रद्द झालेले आहे. भूखंड क्र.सी.-२९ चे वाटप पत्र पुनर्जिवित करण्यात आलेले नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खामगाव (जि. बुलडाणा) येथील औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेवर मेगा टेक्सटाईल हब उभारणीबाबत

**(४) २९१६१ (२२-१२-२०१५). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासन राज्यातील बुलडाणासह ८ कापूस उत्पादक जिल्ह्यांमध्ये सरकारच्या कापूस तेथे गिरणी या धोरणा अंतर्गत मेगा टेक्सटाईल हब उभारणी करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील बुलडाणा जिल्ह्यात सर्वात जास्त कापूस उत्पादन व व्यवसाय खामगाव येथे होतो हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या हब उभारणीसाठी प्रत्येक जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीत जागा निश्चित करण्याचे आदेश औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिका-यांना देण्यात आले, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत अतिरिक्त यवतमाळ (जि.यवतमाळ), चिखली (जि.बुलढाणा), माजलगांव (जि.बीड), कृष्णूर (जि.नांदेड), मालेगांव (जि.नाशिक), भालेर (जि.नंदूरबार) या ठिकाणी मेगा टेक्सटाईल्स पार्कसाठी जमिनी उपलब्ध करुन देण्यात येणार असून आवश्यकतेनुसार या ठिकाणी सी.ई.टी.पी. ची सुविधा तसेच रस्ते, पाणी व वीज व इतर पायाभूत सुविधा पुरविण्यात येणार आहे.

तसेच कन्नड (जि.औरंगाबाद) जामनेर (जि.जळगांव), शेलू (जि.परभणी) येथे भूसंपादनाची कार्यवाही सुरु असून याठिकाणी देखील मेगा टेक्सटाईल्स हबसाठी जमिनी व इतर पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सातपूर (जि.नाशिक) येथील औदयोगिक वसाहतीतील रस्त्याच्या कडेला अवजड कंटेनर्स उभे केले जात असल्याने रहदारीला मोठया प्रमाणात अडथळा निर्माण होत असल्याबाबत

**(५) २९८९२ (२२-१२-२०१५). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपूर (जि.नाशिक) येथील औदयोगिक वसाहत रस्त्याच्या कडेला अवजड कंटेनर्स उभे केले जात असल्याने रहदारीला मोठया प्रमाणात अडथळा निर्माण होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातपूर औद्योगिक वसाहतीतील रस्ता क्र.६ मायको कंपनी समोरील रस्ता क्र. १६ व १७ तसेच अन्य रस्त्याच्या कडेला माल वाहतूक करणारे कंटेनर्स रस्त्याच्या कडेला उभे केले जात असल्याने रहदारीला मोठा अडथळा निर्माण होत असूनही कारखान्यांमध्ये कामावर येणाऱ्या व घरी जाणाऱ्या कामगारांना या कंटेनर्समुळे अनेक वेळा अपघात झाला असून काही व्यक्तींना आपला जीव गमवावा लागला आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :**(१) व (२) सातपूर (जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांनी अवजड कंटेनर्सबाबत तक्रार केल्याच्या अनुषंगाने औद्योगिक क्षेत्रातील ज्या कंपन्यांचे कंटेनर बाहेरगावाहून येत असतात त्या कंपन्यांचे कंटेन बाहेरगावाहून येत असतात त्या कंपन्यांना महामंडळाने दिनांक २४/८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये औद्योगिक क्षेत्रात कार्यान्वित असलेल्या ट्रक टर्मिनसवर अवजड वाहने उभी करण्याबाबत आवाहन केले असून त्या पत्राची प्रत सातपूर पोलिस स्टेशनलाही देण्यात आली आहे. तसेच ट्रक टर्मिनसचा लाभ घेण्याबाबत उद्योजकांना निवेदनही देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे शहर वाहतूक पोलीस विभागाने औद्योगिक क्षेत्रातील अवजड वाहनांवर मोटार वाहन कायद्यान्वये सन २०१३ मध्ये ६५३, सन २०१४ मध्ये ९८० व सन २०१५ मध्ये १०५८ कंटेनरधारक व ट्रक्स यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राष्ट्रीयकृत बँकाकडून शेतक-यांना कर्ज पुरवठा होत नसल्याबाबत

**(६) २९९४२ (२२-१२-२०१५). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर**

**जाधव (गुहागर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा बँकाची आर्थिक परिस्थिती ठीक नसल्यामुळे राष्ट्रीयकृत बँकांवर पीक कर्जाची जादा जबाबदारी टाकण्यात आलेली असताना, केवळ ६५ टक्केच कर्जपुरवठा केल्याची, तर अडचणीत असलेल्या जिल्हा बँकांनी आपले उद्दिष्ट ९८ टक्क्यापर्यंत पूर्ण केल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्र्यांनी दोन वेळा राष्ट्रीयकृत बँकांची बैठक घेऊन त्यांना पीक कर्जासाठी दिलेले लक्ष्य त्यांनी पुरे केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, अडचणीत सापडलेल्या शेतक-यांना मदत करण्यास टाळाटाळ करणा-या राष्ट्रीयकृत बँकेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-१०-२०१६) :** (१) नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेगांव (जि.बुलढाणा) येथील वखार महामंडळाचे गोडाऊन बंद करण्याबाबत

**(७) ३१९९४ (२२-१२-२०१५). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगांव (जि.बुलढाणा) येथील वखार महामंडळाचे गोडाऊन बंद करण्याच्या सूचना माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे गोडाऊन बंद करण्यात येऊ नये, अशी मागणी तेथील शेतक-यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हे गोडाऊन पुन्हा सुरु करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

हे वखार केंद्र दि. ३१.१२.२०१५ पासून बंद करण्यात आलेले आहे.

(२) होय. या संदर्भात मा.मुख्यमंत्री यांच्याकडे ॲड. पुरुषोत्तम डांगरा व इतर शेतक-यांनी मागणी केली आहे.

(३) खाजगी मालकाचे गोदाम भाडे तत्वावर घेऊन कायमस्वरुपी वखारकेंद्र चालविण्याचे महामंडळाचे धोरण नाही. त्यामुळे या ठिकाणी पुन्हा वखार केंद्र सुरु होणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागोठाणे (ता.रोहा,जि.रायगड) येथील निवासी आश्रम शाळेची मान्यता रद्द करण्यात आल्याबाबत**

**(८) ३२०४६ (२१-०१-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागोठाणे (ता.रोहा,जि.रायगड) नागसेन एज्युकेशन सोसायटी ॲण्ड बुध्दिष्ट कल्चरल ट्रस्ट मुंबई संचलित नेल्सन मंडेला निवासी आश्रमशाळा सन २०१५-१६ चे शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर सुमारे दोन महिन्यांनी सदर शाळेची मान्यता रद्द करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या माध्यमिक शाळेत सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात एकूण किती विद्यार्थी दाखल झाले होते,

(३) असल्यास, माध्यमिक शाळेची मान्यता रद्द झाल्याने या शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांच्या पुढील भविष्यासाठी शासनाने कोणती उपायोजना केली वा करणेत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०२-०९-२०१६) :**(१) होय.

(२) माध्यमिक शाळेत सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात एकूण १२ विद्यार्थी शाळेत दाखल झाले होते.

(३) या शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे समायोजन इतर शाळेत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळात कर्मचा-यांची नियुक्ती करण्याबाबत**

**(९) ३२६९६ (१८-०१-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपंगाच्या आर्थिक उन्नतीसाठी २००१ साली महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ स्थापन झाले असून २००५-०६ पासून म्हणजे गेल्या १० वर्षापासून महामंडळातील जिल्हास्तरावर असलेल्या कार्यालयामध्ये एकही कर्मचारी नियुक्त करण्यात आला नसल्याची धक्कादायक माहिती ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच गेल्या १० वर्षापासून सर्व जिल्ह्यांमधील ओबीसी महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांकडे अपंग विकास महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थानकांचाही अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अधिकारी दोन्ही महामंडळातील कामाला योग्य न्याय देण्यास असमर्थ ठरत असून त्यांना अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अपंग विकास महामंडळात जिल्हास्तरावर तातडीने कर्मचारी व अधिकारी नियुक्त करण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (२३-०९-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे. या महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाकरता नयमित पदे मंजूर नसल्यामुळे या महामंडळाकडून सर्व जिल्हा कार्यालयात आवश्यक असणा-या कर्मचा-यांची बाह्यस्त्रोताद्वारे सन २०१० पासून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(२) होय.

(३) अशी बाब नाही. सदरहू अधिकारी हे दोन्ही महामंडळाचे काम समर्थपणे पार पाडत असून, त्यांच्या मदतीसाठी बाह्यस्त्रोताद्वारे आवश्यक कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाढोणा फाटा (ता.सेनगाव, जि.हिंगोली) येथील बंद पडलेले श्री. शरदचंद्र पवार निवासी मुकबधिर विद्यालय त्वरीत सुरु करण्याबाबत**

**(१०) ३३१०९ (२१-०१-२०१६). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाढोणा फाटा (ता.सेनगाव, जि.हिंगोली) येथील बंद पडलेले श्री. शरदचंद्र पवार निवासी मुकबधिर विद्यालय सुरु करण्याबाबतचे आदेश शासनाने माहे फेब्रुवारी, २०१५ च्या दरम्यान दिल्यानंतरही संबंधित शाळेचे व्यवस्थापन पूर्वी स्थायी स्वरुपात कार्यरत असलेल्या शिक्षकांना रुजू करुन घेण्यास हेतुपुरस्पर टाळाटाळ करत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित शिक्षकांनी हिंगोली जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना शाळा व्यवस्थापन रुजू करुन घेत नसल्याबाबत माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात हिंगोली जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाकडून काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२२-०९-२०१६) :** (१) व (२) होय.

(३) सदर संस्थेस जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी त्यांच्या दि.१२.३.२०१५, दि.३.३.२०१५ व दि.१८.३.२०१५ च्या पत्रान्वये संबंधीत कर्मचा-यांना तात्काळ रुजू करुन घेण्याबाबत कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्थिव्यंग निवासी विद्यामंदीर, हिप्परगा रवा ता. लोहारा ही शाळा मौजे, मोहपा ता.कळमेश्वर, जि.नागपूर याठिकाणी स्थलांतरित झाल्याबाबत**

**(११) ३३७९५ (२३-१२-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्थिव्यंग निवासी विद्यामंदीर, हिप्परगा रवा ता.लोहारा ही बंद पडलेली अनुदानित शाळा मौजे, मोहपा ता.कळमेश्वर, जि.नागपूर याठिकाणी हस्तांतरित झाली आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांचे वेतन तांत्रिक कारणे दाखवून संबंधित विभागामार्फत बंद करण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वेतन बंद असल्याने सदर कर्मचा-यांची गैरसोय असलेबाबत व त्यांचे थकीत वेतन तात्काळ सुरू करण्यबाबात उमरगा- लोहारा येथील लोकप्रतिनीधी यांनी मा. सामजिक न्याय मंत्री, व मा. सामजिक न्याय राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केलेली होती हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही कली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०६-०९-२०१६) :** (१) होय.

(२) नियमानुसार प्रस्ताव तपासून कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) दि.२८.९.२०१५ रोजीचे लेखी निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्रामपंचायत माळेगाव ता. सिन्नर (जि. नाशिक) यांस औद्योगिक क्षेत्र माळेगाव, ता. सिन्नर (जि. नाशिक) येथील भूखंड देण्याबाबत**

**(१२) ३५७५५ (२०-०१-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत स्वनिधी मधून अद्ययावत क्रिडा संकुल उभारण्यासाठी ग्रामपंचायत माळेगाव ता. सिन्नर (जि. नाशिक) यांस औद्योगिक क्षेत्र माळेगाव, ता.सिन्नर (जि.नाशिक) येथील भूखंड (Open Space) देण्यात यावा अशी मागणी दिनांक १३ जानेवारी, २०१५ व दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. उद्योगमंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ग्रामपंचायत माळेगाव (ता.सिन्नर, जि.नाशिक) यांनी दिनांक २३/२/२०१६ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, (सातपूर) नाशिक यांच्याकडे औद्योगिक क्षेत्रातील खुली जागा क्रमांक २ क्षेत्र ८१०० चौ.मी. क्रिडा संकुलाच्या प्रयोजनाकरिता मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव व ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रत प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांना सादर केली आहे. ग्रामपंचायत, माळेगाव यांनी क्रिडा संकुलाबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव महामंडळस सादर केला नाही. तथापि, परिपूर्ण प्रस्ताव सादर केल्यानंतर महामंडळाकडून पुढील कार्यवाही प्रचलित धोरणानुसार करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ केवळ अस्थिव्यंग असलेल्या अपंगासाठी असून अन्य प्रवर्गातील अपंगांना योजनांचा लाभ देण्याबाबत

**(१३) ३६१२७ (१८-०१-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ केवळ अस्थिव्यंग असलेल्या अपंगासाठी असून अन्य प्रवर्गातील अपंगांना योजनांचा लाभ देताना महामंडळाकडून अन्याय केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा कार्यालयाकडून विविध कर्जपुरवठा योजनांचा लाभ घेतलेल्या ४०२ लाभार्थ्यांमध्ये ३४९ लाभार्थी अस्थिव्यंग प्रवर्गातील असून ५३ लाभार्थी अन्य प्रवर्गातील असल्याची बाब माहितीच्या अधिकारात उघड झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महामंडळाच्या योजनांच्या लाभार्थ्यांची सख्या व वर्गवारी पाहता या योजना सर्वांपर्यंत पोहोचण्यात महामंडळ अपयशी ठरले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले (१७-०९-२०१६) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरपना तालुक्यात (जि.चंद्रपूर) येथील कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये नियमबाह्य स्थायी नोकर भरती करण्यात आल्याबाबत**

**(१४) ३६६५७ (२२-१२-२०१५). अॅड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना तालुक्यात (जि.चंद्रपूर) येथील कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये नियमबाह्य स्थायी नोकर भरती करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नोकरभरती ही पणन संचालनालयाच्या नियमाला वगळून तत्कालीन प्रशासनाकांनी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमबाह्य नोकर भरती प्रकरणी कोणती चौकशी करण्यात येत आहे वा येणार आहे, चौकशीत काय निष्कन्न झाले वा दोषीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०९-२०१६) :** (१) होय.

(२), (३) व (४) बाजार समितीमध्ये अस्थायी पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना बाजार समितीने कायम करुन त्या नियुक्तीस जिल्हा उपनिबंधकांनी मान्यता दिली आहे तथापि, सदर नोकर भरती अवैध असल्याची बाब निदर्शनास येताच जिल्हा उपनिबंधकांनी त्यांच्या दि. २३.६.२०१६ च्या पत्रान्वये मान्यता रद्द केलेली आहे. तसेच सदर प्रकरणी दोषी व्यक्तींविरुध्द पणन अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याबाबत शासनाच्या दि.५.८.२०१६ च्या पत्रान्वये पणन संचालकास कळविण्यात आले आहे.

---

**अंधेरी (पूर्व) मरोळ औद्योगिक वसाहतीमधील भूखंड लिलाव न करता वितरीत केल्यामुळे महामंडळाचे व शासनाचे होत असलेल्या आर्थिक नुकसानाबाबत**

**(१५) ३७१३० (२२-१२-२०१५). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) मरोळ औद्योगिक वसाहत येथील प्लॉट क्र. x-२२ व X-२२/१ हे महत्वाच्या व मोक्याच्या ठिकाणाचे राखीव भूखंड M/s.GHV Hospitality Pvt. Ltd., यांना लिलाव न करता पूर्वी वितरीत केलेल्या प्लॉटच्या बदल्यात Relocate करुन वितरीत करण्यात आले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महत्वाच्या व मोक्याच्या ठिकाणी असलेले भूखंड लिलावाने वितरीत करण्याचे धोरण औदयोगिक महामंडळ व शासनाचे आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विषयांकित भूखंड रिलोकेट (Re-locate) करुन देण्याऐवजी लिलावाने वितरीत केला असता तर कितीतरी जास्त पटीच्या दराने वितरीत होऊन औद्योगिक महामंडळाचे व पर्यायाने शासनाचे नुकसान झाले नसते हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त विषयी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य कार्यकारी अधिकारी मरोळ औद्योगिक वसाहत यांना पत्र लिहून विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने, पुरातत्व विभागाकडून प्राप्त स्टॉप वर्क नोटीस दिनांक २१ सप्टेंबर, २०११ ची असतांना पूर्वीच्या प्लॉट ऐवजी विषयांकित प्लॉट Re-locate करुन देण्याचा प्रस्ताव यापूर्वीच दि.२८ फेंब्रुवारी, २०११ रोजी मा.उद्योगमंत्री महोदयांकडे सादर कसा करण्यात आला याबाबत पुनश्च खुलासा मागविला होता, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त पत्राबाबत काय कार्यवाही करण्यात आली,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मरोळ औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र. एक्स -२२ चे २७११ चौ.मी. क्षेत्रफळ असलेला भूखंड हा निविदा पध्दतीने मे.जीएचव्ही हॉस्पीटॅलिटी प्रा.लि. या कंपनीस दि.११/०२/२०१० रोजी व्यपारी कारणासाठी वाटप करण्यात आला आहे. तर, एक्स -२२/ चे २४० चौ.मी. क्षेत्रुळ असलेला भूखंड हा निविदाद्वारे प्राप्त झालेल्या दरानुसार दि.२०/०७/२०११ रोजी वाटप करण्यात आला आहे.

मे.जीएचव्ही हॉस्पीटॅलिटी प्रा.लि. यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंड क्र.एक्स-२२ व एक्स-२२/१ वर बांधकाम चालू असताना सदर भूखंड हा महाकाली केव्हज प्रतबंधित १०० मीटर रेषेच्या आतमध्ये असल्यामुळे भारतीय पुरातत्व सर्व्हेक्षण विभागाने त्यांना खोदकाम थांबविण्याबाबत दिनांक २७/९/२०११ रोजी नोटीस बजावली होती. त्यामुळे सदर भूखंडावर बांधकाम करणे कंपनीस शक्य नसल्यामुळे भूधारकांने मरोळ औद्योगिक क्षेत्रातील पॅकेट १ मधून पर्यायी जागा देण्याची विनंती केली होती. त्या अनुषंगाने महामंडळाचे विधीज्ञ मे. लिटील अँड कंपनी यांनी पर्यायी जागा वाटप करता येणे शक्य नसल्यास भूखंडधारकाने एक्स-२२ व एक्स-२२/१ या २९५१ चौ.मी. क्षेत्राकरिता महामंडळाकडे भरणा केलेली रक्कम भुखंडधारकास व्याजासह परत करावी लागेल असे अभिप्राय दिले. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ च्या कलम १५ (अ) नुसार महामंडळास भूखंड अदलाबदल (Exchange) करण्याचे अधिकार असल्याने मे जीएचव्ही हॉस्पीटॅलिटी (इंडिया) प्रा.लि. कंपनीला भूखंड क्रमांक एक्स-२२ व एक्स-२२/१ ऐवजी पर्यायी भूखंड म्हणून झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत महामंडळस प्राप्त झालेल्या पॉकेट क्र.१ क्र. एक्स-२२ चे १९६८ चौ.मी. क्षेत्रफळ असलेला भूखंड निविदा दराने म्हणजेच रु.१,३७,०००/- प्र.चौ.मी. दराने Re-locate करुन दि.३०/०४/२०१३ रोजी वाटप कण्यात आला आहे.

(४) व (५) हे खरे आहे.

भारतीय पुरातत्व विभागाकडून भूखंडधारकांस Stop Work Notice दि.२७/९/२०११ रोजी प्राप्त झाल्याने भूखंडधारकांने दि.९/२/२०१२ रोजी शासनास वस्तुस्थिती कळवून मरोळ औद्योगिक क्षेत्रातील पॉकेट क्र.१ मधून पर्यायी भूखंड देण्याची विनंती केली होती. तथापि, स्थानिक लोकप्रतिनिधींना दि.२४/७/२०१५ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या पत्रामध्ये भूखंडधारकाने शासनास लिहीलेल्या पत्राचा दि.९/२/२०१२ ऐवजी २८/२/२०११ अशी नजरचुकीने

टंकलिखित झाला आहे आणि याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींना दि.२१/१/२०१६ रोजीच्या पत्रान्वये खुलासा करुन दिलगिरी व्यक्त करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औद्योगिक वसाहत जिंतूर (जि. परभणी) मधील अनेक वर्षापासून नियमबाहयपणे भूखंड वापरणा-या उद्योजकांवर कारवाई करण्याबाबत**

**(१६) ३८४५० (२२-१२-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औद्योगिक वसाहत जिंतूर (जि. परभणी) करीता जिंतूर येथे शासनामार्फत जागा संपादीत करण्यात आलेली आहे हे खरे आहे काय, असल्यास किती जागा संपादीत केलेली आहे, असल्यास कधी,
(२) असल्यास, संबंधीत विभागाकडे आजवर किती उद्योगधारकांनी प्रस्ताव सादर केलेले आहेत? कोणत्या उद्योग धारकाने कोणता प्रस्ताव सादर केलेला आहे,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधीमार्फत जिल्हाधिकारी परभणी यांचेकडे माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये उद्योगधारकांना देण्यात आलेला भूखंड हा नियमबाहयपणे वेगळया प्रयोजनासाठी व वापरण्यात येत असल्या बाबतची तक्रार केलेली आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास, अनेक वर्षापासून नियमबाहयपणे भूखंड वापरणा-या उद्योगधारकावर कारवाई करण्याबाबत डोळे झाक करणा-या अधिका-यावर कोणती कारवाई करणार, कधी करणार,
(५) असल्यास, उद्योग धारकावर कोणती कारवाई करणार, कधी करणार,

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
जिंतूर (जि.परभणी) औद्योगिक क्षेत्रासाठी मौजे पुंगळा, ता.जिंतूर येथील ८९.४४ हे. खाजगी जमीन सन १९९५ मध्ये संपादित करण्यात आली आहे.
(२) औद्योगिक, वाणिज्य व सामाईक सुविधांकरिता मिळून एकूण १२४ उद्योजकांना भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे त्याची प्रत सोबत जोडण्यात आली आहे.
(३), (४) व (५) या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींमार्फत जिल्हाधिकारी कार्यालयास नोव्हेंबर, २०१५ मध्ये कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नसल्याचे जिल्हाधिकारी, परभणी कार्यालयाने कळविले आहे. त्यामुळे पुढील कार्यवाही करण्याचा प्रश्न येत नाही.

---

**कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) आवलस, मांडवणे, वेणगांव व गौरकमत या गावांमधील शेतक-यांनी रिलायन्स कंपनीच्या गॅस पाईपलाईनसाठी जमिनी देण्यास विरोध केल्याबाबत**

**(१७) ४०१६५ (२०-०४-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) आवलस, मांडवणे, वेणगांव व गौरकमत या गावांमधील शेतक-यांनी रिलायन्स कंपनीच्या गॅस पाईपलाईनसाठी जमीनी देण्यास विरोध केलेला असतांना याच गावांमधे एचपीसीएल कंपनीच्या पाईपलाईनसाठी शेतक-यांच्या जमीनी अधिग्रहण करण्यात येत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाईप लाईनसाठी जमीनी देण्यास शेतक-यांचा विरोध असतांनाही त्यांच्यावर दबाव टाकून जमीनी संपादित करण्यात येत आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांच्या जमीनी व जमीनीतून काढण्यात येणारे उत्पन्न वाचविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१) उरण-चाकण-शिक्रापूर अशी १६५ कि.मी. लांबीची पाईपलाईन टाकण्याचे काम हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड यांच्यामार्फत करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायु मंत्रालयामार्फत उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी नियुक्त करुन पेट्रोलियम आणि खनिज पाईपलाईन (जमिनीत वापर करणेचा हक्क संपादन करणे) अधिनियम १९६२ नुसार जमिनीमध्ये काम करण्यासाठी जमीनीमध्ये जाण्याच्या हक्कांचे संपादन करण्यात येत असून जमिनीचा वाटप करण्याचा अधिकार संपादन करण्यासाठी कलम ३(१) ची अधिरसूचना दिनांक ८/१०/२०११ मध्ये व ६(१) ची अधिसूचना दिनांक ६/६/२०१४ आणि १८/१/२०१४ रोजी केंद्र शासनामार्फत प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

प्रकल्पाबाबत आवश्यक ती माहिती शेतक-यांना देण्यात येत असून त्यांच्यावर कोणताही दबाव टाकण्यात आलेला नाही. तसेच काही गावांमध्ये शेतक-यांशी चर्चा करुन सामंजस्याने काम सुरु करण्यात आलेले आहे. पोलीस बळाचा वाप करण्यात आलेला नाही. पाईपलाईन टाकल्यामुळे जमिनीवरील झाडे, बांधकामे इत्यादीबाबत होणाऱ्या नुकसानीचा पंचनामा करुन कायद्यानुसार नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात येत आहे. तसेच काम पूर्ण झालेल्या ठिकाणी जमिन पूर्वीप्रमाणे (Restoration) करुन देण्यात येत आहे.

(३) शेतक-यांच्या जमिनीतून पाईपलाईन टाकण्यात आल्यानंतर जमिन पूर्ववत पिक लागवडीसाठी उपलब्ध करुन देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खालापूर तालुक्यातील (जि. रायगड) ९ गावातील शेतक-यांच्या भात पिकाच्या जमिनीवर शासनाने एमआयडीसीचा शिक्का मारल्याबाबत**

**(१८) ४०१७२ (२७-०४-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) ९ गावातील शेतक-यांच्या भात पिकाच्या जमिनीवर शासनाने एमआयडीसीचा शिक्का मारला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात माहे डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या दरम्यान सर्व स्थानिक लोकप्रतिनीधीनी तहसिल कार्यालयावर धडक मोर्चा काढला हे, ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यावेळी देण्यात आलेल्या निवेदनामध्ये कोणत्या मागण्या करण्यात आल्या आहे,

(४) असल्यास, या मागण्यांसदर्भात तसेच एमआयडीसीचा शिक्का काढण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अध्यक्ष, ९ गाव शेतजमीन बचाव कृति समिती, खालापूर यांनी दिनांक २६/११/२०१५ रोजी निवेदन देऊन खालापूर औद्योगिक टप्पा क्र.२ साठी प्रस्तावित केलेले भूसंपादन रद्द करावे व सदर मिळकतीचा गाव नकाश नं.७/१२ वरील नोंदी रद्द कराव्या अशी मागणी केली आहे.

(४) महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अन्वये मौजे केळवली, वांगणी, घोडीवल, कांढरोली, नावंडे, मानकिवली, अंजरुण व हाळखुर्द, ता.खालापूर तसेच मौज तळवली, ता.कर्जत या गावांतील भूसंपादनाची प्रक्रिया चालू आहे. भूसंपादनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, रायगड यांना खातेदारांना नोटीसा बजावून आलेल्या हरकतींचा विचार करुन, त्यांचे म्हणणे विचारात घेऊन, खातेदारांना संधी देऊन हरकती अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. संबंधित शेतकरी व भूसंपादन अधिकारी यांच्यासोबत जमिनीचा मोबदला वाटाघाटीने ठरविण्याबाबत बैठका घेण्यात येत असून शेतक-यांच्या संमतीने भूसंपादन होणार आहे व जमिनीचे दर वाटाघाटीने निश्चित करण्यात येणार आहेत. त्यामुळे शेतक-यांच्या संमतीनेच भूसंपादनाची पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ तालुक्यातील एमआयडीसीमधील जलवाहिनीचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(१९) ४०१७९ (२७-०४-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ तालुक्यातील एमआयडीसी साठी जमीन संपादन करुन बरीच वर्षे लोटली तरी उद्योजकांना पायाभूत सुविधा पुरविण्यात शासनास अपयश आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्योजकांना पुरविण्यात येणारे पाण्याची लाईन टाकण्याचे काम संथगतीने सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, जलवाहिनीचे काम लवकर पूर्ण करण्याबाबत शासन कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

भुसावळ औद्योगिक क्षेत्रात पाण्याची मागणी अत्यल्प असल्याने भुसावळ विकास केंद्रातील विहीरीवरुन तात्पुरती पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यात करण्यात आलेली आहे. सन २०१५ मध्ये पर्जन्यमान कमी झाल्याने विहीरीतील पाण्याची पातळी खालावल्याने एक अतिरिक्त विंधन विहीर घेण्यात आलेली आहे. अशा प्रकारे एकूण ३० m३ पाणीपुरवठा सध्या करण्यात येत आहे. तसेच सदर औद्योगिक क्षेत्रात १३.६९ कि.मी. लांबीचे डांबरीकरण झालेले रस्ते उपलब्ध करण्यात आलेले असून रस्त्यांच्या कडेला विविध व्यासाच्या १२ कि.मी. लांबीच्या जलवितरण वाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे २५७ पथदिवे बसविण्यात आलेले आहेत. तसेच सदर औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी २८२.९० लक्ष (नक्त) व ३२५.३४ लक्ष (ठोक) किमतीचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. मान्यता प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(२) सदर औद्योगिक क्षेत्रासाठी ११कि.मी. लांबीच्या जलवाहिनीचे काम प्रस्तावित असून त्यापैकी ५.६ कि.मी. लांबीचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून त्या कामाची निविदा मंजुरीच्या प्रतिक्षेत आहे.

(३) बाब क्रमांक १ व २ च्या संर्भात उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) औद्योगिक क्षेत्रासाठी ११ कि.मी. लांबीच्या जलवाहिनीपैकी ५.६ कि.मी. लांबीचे काम पूर्ण झाले असून उर्वरित जलवाहिनीच्या कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून निविदा काढण्यात येत आहे. निविदा मंजूर झाल्यानंतर ६ महिन्यात काम पूर्ण करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रानसई (ता.उरण, जि.रायगड) येथील धरणातील गाळ काढणेबाबत**

**(२०) ४०३५६ (०४-०५-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रानसई (ता.उरण, जि.रायगड) येथील धरणातील गाळ काढणेबाबत मा. उद्योग मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणातील गाळ अद्याप पर्यंत काढला गेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) भारत सरकारच्या अखत्यारितील मे.सेंट्रल वॉटर अँड पॉवर रिसर्च स्टेशन, पुणे या संस्थेस रानसई धरणात गाळ साचला आहे किंवा कसे याचे सर्वेक्षणाचे काम देण्यात आले असून संस्थेने दिनांक १९ फेब्रुवारी २०१५ ते २८ फेब्रुवारी २०१५ या कालावधीत सर्वेक्षणाचे काम पूर्ण केले आहे व त्याचा अहवाल दिनरंक २२/१/२०१६ रोजी प्राप्त झाला आहे. अहवालानुसार ०-०२ दशलक्ष घन मीटर म्हणजे धरण साठ्याच्या ०.४४ टक्के इतकाच गाळ असून संस्थेच्याच निरिक्षणाखाली सब बॉटम प्रोफाईलवर सर्वे करुन घेण्याची सूचना दिली आहे. त्यानुसार सदर संस्थेला सर्व शक्यतांचा विचार करुन अहवाल सादर करण्याबाबत दिनांक २/२/२०१६ च्या पत्रान्वये विनंती करण्यात आली असून अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खेर्डी, ता.चिपळूण व लोटे, ता. खेड (जि.रत्नागिरी) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये बेकायदा भंगार गोदामे सुरू असलेबाबत

**(२१) ४०७३७ (२७-०४-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील खेर्डी, ता.चिपळूण व लोटे, ता.खेड येथील औद्योगिक वसाहतीमधील बंद असलेल्या कारखान्यांमध्ये भंगाराची गोदामे थाटण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनधिकृत भंगार गोदामांना शासनाने पाणी व वीजपुरवठा दिला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनधिकृत भंगार गोदामांना संरक्षण तसेच वीज, पाणीपुरवठा व अन्य सोयीसुविधा पुरविणाऱ्या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे,

(४) भंगार गोदामे असलेली बंद कारखान्यांची जागा अन्य उद्योगांना उपलब्ध करून देण्यासाठी शासन कोणते प्रयत्न केले वा करीत आहेत,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१) खेर्डी व लोटे येथील भूखंड हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योजकांना उद्योग सुरु करण्यासाठी वाटप केले आहेत. तथापि खेर्डी येथील ज्यांचे कारखाने बंद आहेत अशा ६ उद्योजकांनी भंगाराची गोदामे थाटली असल्याचे निदर्शनास आल्यावर संबंधित उद्योजकांना महामंडळाने नोटीसा बजावल्या असून त्यापैकी एका संबंधित उद्योजकांने भंगार गोदाम बंद केले आहे. उर्वरित ५ उद्योजकांवर महामंडळाचे नियमानुसार कारवाई करण्यात येत असून दिनांक ९/५/२०१६ रोजी पुन:श्च नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

(२), (३) व (४) महामंडळ औद्योगिक क्षेत्र विकसित करतांना उद्योजकांना पायाभूत सुविधा म्हणजेच रस्ता, पाणी, वीज इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देतो व उद्योजकांनी करारनाम्यात नमूद केलेल्या कालावधीमध्ये भूखंड विकसित करणे आवश्यक असते, त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी महामंडळाने भंगार गोदामांना पाणीपुरवठा दिलेला नसून तो भूखंडधारकांस उद्योगासाठी दिलेला आहे. तथापि भंगार गोदामे बंद न करणाऱ्या भूखंडधारकाचा वस्तुस्थिती अहवाल घेऊन पाणी व वीज पुरवठा बंद करण्यात येईल व भूखंडधारकांवर करारनाम्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील औद्योगिक वसाहतीमध्ये**
**ट्रक टर्मिनलच्या रखडलेल्या प्रस्तावाबाबत**

**(२२) ४१०१९ (२७-०४-२०१६). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील तीन औद्यागिक वसाहतीलगत ट्रक टर्मिनल उभारण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग क्र. एन एच - ०४ वर कागल, कोल्हापूर ते मुंबई जे.एन.पीटी बंदरापर्यंत एकही ट्रक टर्मिनल नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी जिल्हा लॉरी ऑपरेटरस असोसिएशनने एमआयडीसी कडे ट्रक टर्मिनल साठी आरक्षित जागेची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

तथापि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांच्या औद्योगिक क्षेत्रापैकी शिरोली औद्योगिक क्षेत्र व कागल हातकणंगले औद्योगिक क्षेत्रात अनुक्रमे भूखंड क्र. एएमचे ३००० चौ.मी. व भूखंड क्र.एएम-१/ए चे २०००० चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचे भूखंड राखीव ठेवण्यात आले आहेत.

(२) राष्ट्रीय महामार्ग ४ लगत ५ कि.मी. अंतरावर व जे.एन.पी.टी. बंदारापासून ३५ कि.मी. अंतरावर पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रामध्ये ट्रक टर्मिनल कार्यान्वित आहे.

(३) अध्यक्ष, कोल्हापूर डिस्ट्रीक्ट लॉरी ऑपरेटर्स असोशिएशन यांनी वाहनतळासाठी कागल-हातकंणगले पंचताराकिंत औद्योगिक क्षेत्र, शिरोली औद्योगिक क्षेत्र तसेच गोकूळ औद्योगिक क्षेत्रात प्रत्येकी २०,००० चौ.मी. जागेची मागणी महामंडळाकडे केली होती. याबाबत अध्यक्ष, कोल्हापूर डिस्ट्रीक्ट लॉरी असोशिएशनला दिनांक ५/७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्प अहवाल, बांधकाम नकाशा, प्रक्रिया शुल्क इत्यादी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तथापि अदयापपर्यंत त्यांनी उक्त कागदपत्राची पूर्तता केलेली नाही. त्यामुळे पुढील कार्यवाही करण्यात आलेली नाही तथापि सदर असोशिएशनने कागदपत्रांची पूर्तता केल्यानंर महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

---

## एमआयडीसी उद्योगासाठी स्वस्तात भूखंड घेऊन त्याचा वापर न करणाऱ्या उद्योगांवर नोटिसा बजाविण्यात आल्याबाबत

**(२३) ४१२७४ (२७-०४-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) उद्योगासाठी स्वस्तात भूखंड घेऊन त्याचा वापर न करणाऱ्या पुण्यातील सुमारे ३७५ जणांना नोटिसा बजाविण्याची प्रक्रिया सुरू केली असल्याचे माहे जाने, २०१५ मध्येवा त्यादरम्यान निदर्शनास आल्याचे खरे आहे काय,

(२) असल्यास, येत्या वर्षात उद्योग उभारणी न केल्यास भूखंड काढून घेतले जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उद्योग उभारणीसाठी पुणे, मुंबई आणि नाशिकमध्ये एक हजारावर भूखंड स्वस्तात घेतलेले आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भूखंडधारकांवर काय कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :**(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगासाठी स्वस्तात भूखंड घेतलेले नसून औद्योगिक क्षेत्रासाठी भूसंपादन करुन भूखंडांचे आरेखन करुन महामंडळाच्या प्रचलित दराने भूखंडांचे वाटप केले आहे. तसेच ज्या भूखंड धारकांनी करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार भूखंडाचा विहीत कालावधीत विकास करुन बांधकाम पूर्णत्वाचा दाखला प्राप्त केलेला नाही अशा भूखंड धारकांना नोटीसा बजावण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(२) महामंडळाच्या दिनांक २३/१०/२०१५ च्या परिपत्रकानुसार ज्या भूखंडधारकांनी अद्यापपर्यंत भूखंडाचा विकास केला नाही त्या भूखंडधारकांना शेवटची संधी म्हणून महामंडळाने उद्योग संजीवनी योजना २०१५ राबविली असून तिचा लाभ घेतलेल्या लाभार्थींना भूखंडाचा विकास करण्यासाठी ३१/८/२०१७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. मात्र त्यानंतरही जे भूखंड मोकळे आहेत किंवा ज्या भूखंडांव बांधकाम सुरु आहे किंवा ज्यांनी भूखंड विकसित केला नाही असे भूखंड परत घेण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येणार आहे.

(३) व (४) महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडांचे वाटप हे महामंडळाच्या प्रचलित दराने करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई एमआयडीसीत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२४) ४४१७५ (२७-०४-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई एमआयडीसी क्षेत्रात नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी नवी मुंबई महापालिकेने एमआयडीसीकडे एकूण २३२ भूखंडाची मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणी केलेले उक्त २३२ भूखंड औद्योगिक दराने न देता नाममात्र दराने मिळावेत म्हणून मागणी केली असल्याने यांदर्भात एमआयडीसीचा धोरणात्मक निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर २३२ भूखंड नाममात्र दराने नवी मुंबई महापालिकेस उपलब्ध करुन देण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :**(१) हे खरे आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने सार्वजनिक शौचालय, आरोग्य केंद्र / रुग्णालय, शाळा अंगणवाडी, क्रिडांगण, उद्यान, जलकुंभ, समाजमंदीर, मार्केट, स्मशानभूमी, दफनभूमी इत्यादी मूलभूत सुविधा नागरिकांना पुरविण्याकरिता जागा अपूरी पडत असल्याने २३३ भूखंडांची मागणी केली आहे.

(२) व (३) महामंडळाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार नवी मुंबई महानगरपालिकेस दिनांक १७/४/२०१५ रोजीच्या पत्रान्वये भूखंडासंदर्भात लेखी स्वरुपात महामंडळाच्या अटी मान्य असल्याबाबत संमतीपत्र देण्याची विनंती करण्यात आली आहे. तथापि नवी मुंबई महानगरपालिकेकडून अद्याप संमतीपत्र देण्यात आलेले नाही. संमती प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीमध्ये वाहन तळासाठी असलेल्या राखीव जागेबाबत

**(२५) ४५३२० (२७-०४-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतीमध्ये वाहन तळासाठीची राखीव जागा असून तसा प्रस्ताव कोल्हापूर परिसरातील औद्योगिक संघटनासह अन्य संघटनांनी राज्य शासनाकडे गेल्या काही वर्षापासून पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाहनतळाच्या प्रस्तावावर अद्यापपर्यंत निर्णय न घेण्याची कारणे काय आहे,

(३) असल्यास, या संदर्भात शासन निर्णय घेणार आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. तथापि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहतीमध्ये श्री.विनायक एन.देवणेकर मे.विमलेश्वर ऑटोमोबाईल्स ट्रेड रिअल ट्रेंनिंग संस्था व अध्यक्ष कोल्हापूर डिस्ट्रीक्ट लॉरी ऑपरेटर्स असोसिएशन यांनी वाहनतळासाठी शिरोली औद्योगिक क्षेत्र कागल हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र व गोकूळ-शिरगाव औद्योगिक क्षेत्रात प्रत्येकी २०००० चौ.मी. भूखंडाची वाहनतळासाठी मागणी केली होती त्या अनुषंगाने महामंडळाने त्यांना आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि सदर संस्थांनी अद्यापपर्यंत कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही, त्यामुळे वाहनतळासंदर्भात कार्यवाही करण्यात आलेली नाही, तरी सदर संस्थांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर महामंडहाच्या प्रचलित धोरणानुसार पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

---

### ठाणे महानगरपालिकेतील अनेक गावांचा पाणीपुरवठा खंडीत केल्याबाबत

**(२६) ४५८६० (२७-०४-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेत समावेश असलेल्या २७ गावांच्या पाणीपुरवठ्याची तब्बल ९५ कोटी थकबाकी झाल्यामुळे एमआयडीसीने या गावातील पाणीपुरवठा खंडीत केल्याने नागरिकांनी कल्याण येथे रास्तारोको आंदोलन केले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांतील पाणी पुरवठा खंडीत न करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१) व (२) कल्याण येथे नागरिकांनी रास्तारोको आंदोलन केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि २७ गावे ही ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रातील नसून कल्याण-डोंबिवली महानगरपलिकेत समाविष्ट झालेली आहेत. तसेच त्या २७ गावांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत बारवी पाणीपुरवठा योजनेतून ४१ जोडण्यांद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सदर २७ गावांच्या पाणीपुरवठ्याची माहे फेब्रुवारी, २०१६ पर्यंतची रु.१०४.१९ कोटी इतकी थकबाकी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडे थकीत आहे. तथापि बारवी व आंध्र धरणातील पाणीसाठा खालावल्यामुळे जलसंपदा विभागाने पाणीकपात लागू केलेली आहे. तसेच थकबाकीच्या वसुलीसाठी एमआयडीसीने प्रस्तुत २७ गवांचा पाणीपुरवठा अद्याप खंडीत केलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबरनाथ तालुक्यातील एम.आय.डी.सी प्रत्यक्षात पाणी योजनाच अस्तित्वात नसतांना एम.आय.डी.सी. पाणी पुरवठा विभागाकडे हाजीमलंगवाडी ग्राम पंचायतीच्या नावे थकबाकी कागदोपत्री दाखवली जात असल्याबाबत**

**(२७) ४५८८१ (२७-०४-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ तालुक्यातील एम.आय.डीसी. पाणी योजना हाजीमजंगवाडीच्या नावे मंजूर असून ती खरड गावापर्यंतच कार्यान्वीत असून प्रत्यक्षात पाणी योजनाच अस्तित्वात नसताना एम.आय.डी.सी. पाणी पुरवठा विभागाकडे हाजीमलंगवाडी ग्राम पंचायतीच्या नावे थकबाकी कागदोपत्री दाखवली जात आहेत त्यामुळे हाजीमलंगवाडी ग्राम पंचायतीस नवीन पाणी पुरवठा योजना उसाटणे मार्गे सुरु करण्याची ग्रामपंचायतीची मागणी होत असून त्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.उद्योग मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३/६/२०१५ रोजी निवेदन दिले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे हाजीमलंगवाडीसाठी प्रत्येक वर्षी उन्हाळी हंगामासाठी तात्पुरत्या स्वरुपाची ८० मि.मि. व्यासाची नळजोडणी दिनांक १७/०४/१९९३ पासून देण्यात आली होती. तथापि पंचायत समिती हाजीमलंग यांच्याकडून पाणी पुरवठ्याच्या देयकाची रक्कम भरणा करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे दिनांक २५-६/२००५ पासून सदर नळजोडणी बंद करण्यात आली आहे. तसेच सदर नळजोडणीची पाणीपट्टी रु.९,५४,२५७/- व विलंब शुल्क रु.२५,५३,८७३/- अशी एकूण २५,०८,१३०/- इतकी रक्कम मार्च, २०१६ पर्यंत थकित आहे.

ग्रुप ग्रामपंचायत हाजीमलंगवाडीसाठी पिण्याच्या पाणी पुरवठा योजनेकरीता महामंडळाच्या उसाटणे मार्गे जाणाऱ्या जलवाहिनीवरुन नळजोडणी देण्याच्या प्रस्तावास महामंडळाने दिनांक २१/२/२०१२ रोजी मंजूरी देऊन ग्रुप ग्रामपंचायत, हाजीमलंगवाडी यांना दिनांक २०/३/२०१२ च्या पत्रान्वये नळजोडणी मंजूरीबाबत तसेच जुन्या तात्परुरत्या नळाजोडणीची थकाबाकीची रक्कम भरणे व इतर अटी पूर्ण करण्याबाबत कळविले होते. तथापि त्यानी अद्यापपर्यंत आवश्यक कागदपत्रे व नविन नळजोडणीची रक्कम आणि थकित रकमेचा भरणा केलेला नाही. त्यामुळे नळजोडणी कार्यान्वित करण्यात आलेली नाही. तथापि पाणीपट्टीची रक्कम रु. ९,५४,२५७/- तसेच सुरक्षा अनामत रक्कम, नळजोडणीचा खर्च, पाणीपुरवठा करारनाम्याच्या प्रतीची किंमत आगाऊ भरणा केली तर ग्रुप ग्रामपंचायत, हाजीमलंगवाडी यांना ८० मि.मी. व्यासाची नवीन नळजोडणी कार्यान्वित करणे शक्य होणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औद्योगिक वसाहतीत अनेकांनी जमिनी मिळवल्या मात्र, प्रत्यक्षात त्या जागेवर उद्योग उभे राहिलेले नसल्याबाबत**

**(२८) ४७७२२ (२७-०४-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयात उद्योगांना चालना मिळावी म्हणून औद्योगिक वसाहतीत अनेकांनी जमीन मिळवल्या मात्र, प्रत्यक्षात त्या जागेवर उद्योग उभे राहिलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १८ उद्योजकांनी उद्योग सुरु करण्यात दिरंगाई केली असून ते शासनाची फसवणूक करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूखंडाचा वापर न करणाऱ्या भूखंडधारकांना एक वर्षाची मुदतवाढ दिली होती मात्र त्यावर अद्याप कोणताही निर्णय उद्योजकांनी घेतला नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द शासनाने कोणतीही कार्यवाही अद्याप केली नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जे उद्योग पूर्णपणे बंद झाले आहेत त्याची चौकशी करुन जागांचा फेरलिलाव करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, होणाऱ्या दिरंगाईची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :** (१), (२) व (३) अकोला जिल्हयात एकूण ७ औद्योगिक क्षेत्र स्थापन केलेली असून त्यावर १७१३ भूखंडांचे आरेखन करण्यात आलेले आहे. त्यापैकी १६५२ भूखंडांचे वाटप करण्यात आले असून त्यातील ६१९ भूखंडांवर उत्पादन सुरु आहे तर १७९ भूखंडांवरील उत्पादन सुरु होऊन बंद झालेले आहे व १०० भूखंडांचा विहीत कालावधी शिल्लक आहे.

उद्योजकांना भूखंड वाटप केल्यानंतर प्राथमिक करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार भूखंडाचा विकास करणे व भूखंडावर कारखाना इमारतीचे बांधकाम करुन इमारत बांधाकम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी ५ वर्षाचा कालावधी देण्यात येतो. तथापि ज्या भूखंडधारकांनी बांधकाम करुन बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र अभियांत्रिकी विभागाकडून प्राप्त करुन घेतलेले नाही त्यांना एक शेवटची संधी म्हणून महामंडळाने सन २०१५ मध्ये संजीवनी योजना जाहिर केली असून त्यानुसार भूखंडाच्या विकासाकरिता ३१/८/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर कालावधी अद्याप शिल्लक असल्यामुळे भूखंडधारकांवर कार्यवाही करणे शक्य नाही. तथापि सदर कालावधी संपुष्टात आल्यानंतर जे भूखंडधारक भूखंडाचा विकास करणार नाहीत असे भूखंड परत घेण्याची कार्यवाही महामंडळाकडून करण्यात येईल.

(४), (५) व (६) बंद उद्योगावर विविध दावे व बँकांचे तारण इत्यादी असल्यामुळे फेर लिलाव काढण्यास M ID C सक्षम होत नाही.

---

**नांदगावपेठ (जि.अमरावती) येथील एमआयडीसीत गारमेंट हब उभारण्याबाबत**

**(२९) ४८१३५ (२७-०४-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील नांदगावपेठ येथील एमआयडीसीत गारमेंट हब करण्याचा शासनाचा विचारअसल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रश्नांबाबत निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६) :**(१) सन २०१२ मध्ये अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्रात ५०० हेक्टर जागेवर टेक्सटाईल पार्क विकसित करण्यात आला आहे.

(२)

१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अमरावती पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रातील ५०० हे.आर जागा टेक्सटाईल पार्कसाठी नियोजित केली असून त्यामध्ये ३८ भूखंड आरेखित केले आहेत. रस्ते, पथदिवे व जल वितरिका यासारखी विकासाची कामे महामंडळाकडून हाती घेण्यात आली आहेत.

२) ॲडव्हांटेज विदर्भ अंतर्गत झालेल्या सामंजस्य करारानुसार ३ टेक्सटाईल कंपन्यांना जागा मंजूर करण्यात आली आहे.

३) टेक्सटाईल उद्योगाच्या सोईकरिता ५ एम.एल.डी. क्षमतेची सीईटीपी तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

४) पाणीपुरवठा करण्याकरिता २५.०० एमएलडी क्षमतेची पाणी पुरवठा योजना अप्पर वर्धा धरणातून कार्यान्वित करण्यात आली आहे.

५) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने २०MVA क्षमतेचे ३३/११ के.व्ही. चे सब स्टेशन कार्यान्वित केले असून सद्य:स्थितीत १.७MVA वीज पुरवठा करण्यांत येत आहे. २०MVA क्षमतेचे ३३/११ के.व्ही.चे. ०२ सब स्टेशनचे काम सुरु आहे.

६) सद्यःस्थितीत ११ उद्योजकांना वाटपपत्र, ६ उद्योजकांना देकारपत्र व २ उद्योजकांना Comfort Letter निर्गमित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलिबाग व मुरूड (जि. रायगड) तालुक्यातील सागरी धुप प्रतिबंधक बंधा-यांना मान्यता देणेबाबत

**(३०) ४८२४८ (२०-०५-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग व मुरुड (जि. रायगड) तालुक्यातील सागरी धुप प्रतिबंधक बंधा-यांना मान्यता देण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडे प्रस्ताव सादर केले असताना दिनांक ३१ जानेवारी, २०१६ पर्यंत प्रस्तावांना मान्यता देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अलिबाग व मुरूड तालुक्यातील शेती व बागायती सुरक्षित राखण्याच्या दृष्टीने प्रस्तावांना मान्यता देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अलिबाग तालुक्यातील मांडवा, रेवदंडा, सासवणे, अलिबाग व नवेदर नवगांव ही ५ कामे राज्य अर्थसंकल्प २०१६-२०१७ मध्ये समाविष्ट असून यांची एकत्रित अंदाजित किंमत रु.४५०.०० लक्ष एवढी आहे व त्या कामांसाठी रु.१६३.०५ लक्ष एवढी आर्थिक तरतुद करण्यात आली आहे.

मुरुड तालुक्यातील काशिद हे एक काम राज्य अर्थसंकल्प २०१६-२०१७ मध्ये समाविष्ट असून यांची अंदाजित किंमत रु.४००.०० लक्ष एवढी आहे व या कामांसाठी रु.८६.९६ लक्ष एवढी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

तसेच तेरावा वित्त आयोग अंतर्गत थळ, बागदांडा, थेरोंडा या कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त असून या कामांची एकत्रित अंदाजित किंमत रु.६२६.६६ एवढी आहे.

उपरोक्त सर्व कामांना सीआरझेड परवानगी मिळवणे व निविदा प्रक्रिया पूर्ण करुन ही सर्व कामे पावसाळ्यानंतर निधी उपलब्धतेनुसार हाती घेवून पूर्ण करण्यात येतील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिंतूर (जि.परभणी) येथे उभारण्यात आलेल्या औद्योगिक वसाहतींना (एमआयडीसी) मुलभूत सोयीसुविधा नसल्याबाबत

**(३१) ४८४१६ (२७-०४-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर (जि.परभणी) येथे उभारण्यात आलेल्या औद्योगिक वसाहतींना (एमआयडीसी) मुलभूत सोयीसुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसाहतीची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर वसाहतींना मुलभूत सुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६)** :(१) व (२) जिंतूर औद्योगिक क्षेत्रासासाठी महामंडळाने एकूण ८९.४८ हे.आर क्षेत्र संपादित केले आहे. तसेच सदर क्षेत्रात एकूण ५.८८ कि.मी. लांबीचे डांबरी रस्ते बांधण्यात आले आहेत. त्यापैकी, ३.६८ कि.मी. लांबीच्या रस्त्यावर ११४ पथदिवे बसविण्यात आले आहेत. खुल्या तसेच विंधन विहीरीमधून ५.८८ कि.मी. लांबीच्या जलवितरणिकेद्वारे २४ तास पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.
(३) जिंतूर औद्योगिक क्षेत्रात सद्य:स्थितीत दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे १४ घ.मी.प्रति दिन पाणीपुरवठा करण्यात येत आहे. उर्वरित २.२० कि.मी. लांबीच्या रस्त्यावर पथदिवे बसविण्यासाठी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असून निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर ६ महिन्यात काम पूर्ण करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विविध भागातील औद्योगिक विकास महामंडळाचे (एमआयडीसी) मोकळे भूखंड ताब्यात घेण्याबाबत

**(३२) ४८८१६ (२७-०४-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध भागातील औद्योगिक विकास महामंडळाचे (एमआयडीसी) मोकळे भूखंड ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु असून माहे जानेवारी, २०१६ अखेरपर्यत सुमारे १७०० भूखंड ताब्यात घेण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त भूखंड कोणत्या कारणांमुळे ताब्यात घेण्यात आले आहेत व त्याचा वापर कशाप्रकारे करण्यात येणार आहे,
(३) अदयाप, एमआयडीसीकडून किती भूखंड ताब्यात घेण्याचे बाकी आहे व ते केव्हा ताब्यात घेण्यात येणार आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०९-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
महामंडळाने एप्रिल, २०१६ अखेरपर्यंत १४७४ भूखंड ताब्यात घेतले असून मोकळे भूखंड ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(२) औद्योगिक क्षेत्रात वाटप केलेला भूखंड भूखडधारकाने करारनाम्यातील तरतुदीनुसार विहीत कालावधीत / वाढीव कालावधीत विकसित न केल्यास असे मोकळे भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही महामंडळामार्फत करण्यात येते. ताब्यात घेतलेल्या भूखंडांबाबत महामंडळाने दिनांक ३/६/२०१४ च्या परिपत्रकानुसार धोरण निश्चित केले असून सदर भूखंडधारकांचे रक्कम

परतावा आदेश काढून रक्कम परतावा आदेशाच्या दिनांकापासून ३ महिने पूर्ण झाल्याबरोबर सदर भूखंड रिक्त भूखंडाच्या यादीत समाविष्ट करुन भूखंड प्राधान्य सदराखाली अथवा उद्योग विस्तारासाठी वाटप करण्यात येणार आहेत.

(३) महामंडळाने दिनांक २३/१०/२०१५ च्या परिपत्रकान्वये उद्योग संजीवनी योजना जाहिर केली असून त्यानुसार भूखंडाच्या विकासाकरिता शेवटची संधी म्हणून उद्योजकांना ३०/४/२०१७ पर्यंत मुदतवाढ मंजूर केली आहे. त्यामुळे भुखंड विकासाचा विहीत कालावधी संपल्यानंतर किंवा मुदतवाढ घेऊनही जे भूखंडधारक भुखंडाचा विकास करणार नाहीत असे भूखंड परत घेण्याची कार्यवाही महामंडळामार्फत करण्यात येणार आहे.

---

**औरंगाबाद शहरातील जटवाडा व पहाडसिंगपुरा शिवारातील अहिरमाळ डोंगरावर असलेल्या शेतजमिनीकडे जाण्यासाठी रस्ता नसल्याबाबत**

**(३३) ४८९५३ (२९-०४-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील जटवाडा व पहाडसिंगपुरा शिवारातील अहिरमाळ डोंगरावर असलेल्या शेतजमिनीकडे जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे शेतक-यांसाठी रस्ता व्हावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजी लेखी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरात गवळी समाजातील लोकांची वस्ती असल्याने ग्रामस्थांना व शेतजमीन असलेल्या शेतक-यांना अहिरमाळ येथे जाण्यासाठी रस्ता करण्यात यावा असे निर्देशही केंद्रीय सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री यांनी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे वा विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०८-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) औरंगाबाद शहरातील जटवाडा व पहाडसिंगपुरा शिवारातील अहिरमाळ डोंगरावर असलेल्या शेतजमिनीकडे जाण्यासाठी स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत घाट कटिंग व मातीकाम करुन रस्ता तयार करण्यात आला आहे. त्यावरुन सद्या ट्रॅक्टर व त्या सारखी वाहने जावू शकतात. पावसाळ्यात अडथळा येऊ शकतो. त्याकरिता सदरील रस्ता बारमाही करण्यासाठी रस्त्याचे ग्रेडमध्ये घाट कटिंग करुन त्यावरील सर्व सीडी वर्क व रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी रु.२११.५६ लक्ष किंमतीचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करुन जिल्हा नियोजन समितीकडे प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. जिल्हा नियोजन समितीने प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर व जिल्हा परिषदेकडून नाहरकत प्राप्त झाल्यानंतर काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

## राज्यातील ५२ हजार कोटी रुपयांच्या आठ (८) पायाभूत सुविधा प्रकल्पांना मंजूरी दिल्याबाबत

**(३४) ५१७१८ (१९-०५-२०१६). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मंत्रीमंडळाच्या पुनर्रचित पायाभूत सुविधा समितीने दिनांक १ डिसेंबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत राज्यातील ५२ हजार कोटी रुपयांच्या आठ (८) पायाभूत सुविधा प्रकल्पांना मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे प्रकल्प कोणकोणते आहेत व ते किती कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे,

(३) सदर प्रकल्पांना लागणाऱ्या निधीचे नियोजन कशाप्रकारे करण्यात आले आहे वा करण्यात येणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०९-२०१६) :** (१) होय.

दिनांक ३०.११.२०१५ रोजी मंत्रीमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत ८ प्रकल्पांस व त्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास कार्यान्वयिन यंत्रणा म्हणून मंजूरी देण्यात आली आहे.

(२) राज्य मंत्रीमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीच्या झालेल्या बैठकीत महाराष्ट्र राज्य रस्ते महामंडळाच्या खालील आठ प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १. | ठाणे-घोडबंदर रस्त्यावर सा.क्र. ०/० ते ४/४०० दरम्यान उन्नत मार्ग बांधणे. |
| २. | मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाची क्षमता वाढ |
| ३. | ठाणे येथील टिकुजिनीवाडी ते बोरीवली दरम्यान बोगद्याचे बांधकाम. |
| ४. | भिवंडी-कल्याण शिळ रस्त्यावर उन्नत मार्गाचे ६ पदरी करण्याचे बांधकाम. |
| ५. | नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे. |
| ६. | वाकण-पाली-खोपोली रस्त्याचे चौपदरीकरण करणे. |
| ७. | सायन-पनवेल रस्त्यावर ठाणे खाडीपूल ३ चे बांधकाम. |
| ८. | विदर्भातील २७ रेल्वे उड्डाणपूलाचे बांधकाम करणे. |

उक्त प्रकल्पाचे सुसाध्यता व सविस्तर प्रकल्प अहवाल येत्या सहा महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजित असून आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्यावर व जमिन संपादनाची कार्यवाही पूर्ण झाल्यावर प्रकल्पांच्या आर्थिक सुसाध्यतेनुसार निधीची उपलब्धता व पायाभूत सुविधा समितीची मान्यता मिळाल्यावर प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात येईल.

(३) प्रकल्पांच्या सुसाध्यता अहवालांचा अभ्यास करुन त्यानुसार प्रकल्पांसाठी लागणाऱ्या निधीच्या आवश्यकतेनुसार विविध आर्थिक स्त्रोतांच्या पर्यायांचा विचार करण्यात येईल.

---

**माखजन-करजुवे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३५) ५३०३९ (६-०५-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माखजन-करजुवे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे दळणवळणाची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता सुधारणा करण्याबाबत स्थानिक नागरीकांनी वारंवार मागणी करूनही त्याकडे दुर्लक्ष होत आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याची सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०९-२०१६) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्नांकित रस्ता लांबीमध्ये रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पावसाळ्या दरम्यान पडलेले खड्डे डांबर मिश्रित खडीने भरण्यात आलेले असून, रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे. रस्त्याच्या काही लांबीमध्ये डांबरी पृष्ठभागाचे नुतनीकरण करणाचे काम मंजूर असून पावसाळ्यानंतर हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**संगमेश्वर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) शास्त्रीपूल ते कसबा संभाजी चौक रस्ताची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३६) ५३०४४ (६-०५-२०१६). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर तालुक्यातील (जि.रत्नागिरी) शास्त्रीपूल ते कसबा संभाजी चौक रस्ता मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले असल्यामुळे रस्त्याची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गावरून होणारी वाहतुकीची गैरसोय टाळण्यासाठी रस्त्याची सुधारणा व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०९-२०१६) :**(१) नाही.

(२) प्रश्नांकित रस्त्याच्या लांबीमध्ये डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे डांबर मिश्रित खडीने भरण्यात आलेले आहेत. रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे. या लांबीमध्ये डांबरी पृष्ठभागाचे नुतनीकरण करण्याचे काम मंजूर असून पावसाळ्यानंतर हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाचोरा तालुक्यातील (जि.जळगाव) गिरणा नदीवर**
**करूंगी ते उत्राण (ता.एरंडोल) या ठिकाणी पुलाचे बांधकाम करण्याबाबत**

**(३७) ५३१३१ (०६-०५-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा तालुक्यातील (जि.जळगाव) गिरणा नदीवर करूंगी ते उत्राण (ता.एरंडोल) या ठिकाणी पुलाचे बांधकाम झाल्यास नागरिकांच्या वेळेची व इंधानाची बचत होणार असून यासंदर्भात नागरिक वारंवार मागणी करित असल्याने या ठिकाणी पुलाचे बांधकाम होण्याकरीता मा.जलसंपदा मंत्री यांना स्थानिक लोकप्रतीनिधींनी दिनांक १ डिसेंबर, २०१५ रोजीच्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०९-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) विषयांकित रस्ता सन २००१-२१ च्या रस्ते विकास आराखड्यात समाविष्ट नाही. सदरचा रस्ता योजनाबाह्य आहे. मागणीकृत पूल हा योजनाबाह्या रस्त्यावर येत असून योजनाबाह्य रस्त्यावर पूल बांधणे हे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निकषात बसत नाही.

---

**घिवली (ता.जि.पालघर) गावाच्या समुद्र किनारी धुप प्रतिबंधक**
**बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(३८) ५३३१५ (२०-०५-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घिवली (जि.पालघर) गावाच्या समुद्र किनारी धुप प्रतिबंधक बंधा-यांचे सन २००९-१० मध्ये २०० चौरस मीटर व सन २०१०-११ मध्ये २५० चौरस मीटर लांबीचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत ७०० चौरस मीटर लांबीचे काम अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घिवली गावाच्या पश्चिम, उत्तर व पूर्व या तीन्ही दिशेने समुद्राचे पाणी येत असल्यामुळे गावाला धोका निर्माण झाला असून सदरहू ७०० चौ.मी. लांबीच्या कामास शासनस्तरावर अदयापपर्यंत निधी मंजूर झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निधी मंजूर करुन काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०९-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

सन २००९-१० मध्ये २०० मीटर व सन २०१०-११ मध्ये २५० मीटर लांबीचा बंधारा पूर्ण करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात ४७११ या राज्यस्तरीय योजनेअंतर्गत धिवली ता.पालघर येथे ११०.०० मी. लांबीचा समुद्र धुप प्रतिबंधक बंधारा बांधण्याच्या कामास रु.१५० लक्ष एवढ्या अंदाजित किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून या कामासाठी रु.३२.६१ लक्ष एवढी आर्थिक तरतूद उपलब्ध करण्यात आली आहे.

(३) पर्यावरण विभागाची मान्यता (सी.आर.झेड) व निविदा प्रक्रिया या बाबी पूर्ण करण्याचे काम तातडीने सुरु असून साधारणपणे पावसाळ्यानंतर हे काम हाती घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे जिल्ह्यातील हवेली व खडकवासला, पुणे अंतर्गत आमदार निधीतील कोट्यावधींची सुचविलेली विकास कामे सा.बां.दक्षिण विभाग, पुणे मार्फत संथ गतीने चालू असल्याबाबत

**(३९) ५४४४२ (२४-०८-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील हवेली व खडकवासला भागातील २१८९५ अंतर्गत आमदार निधीतील सुचविलेली विकास कामे सा.बां.दक्षिण विभाग, पुणे मार्फत संथगतीने चालू असल्याचे दिनांक ०८ जून, २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आल्याचे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार पाठपुरावा करत असतांना अनावश्यक त्रुटी काढून अपात्र कामे सोडून इतर पात्र कामे ही संबंधित विभाग करत नसल्याचे खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांच्या प्रचंड असंतोषाला लोकप्रतिनिधींना सामोरे जावे लागत असल्याचे ही खरे आहे काय,

(४) उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०९-२०१६) :** (१) व (२) हे खरे नाही.

आमदार महोदयांनी सन २०१५-१६ मध्ये सुचविलेल्या ३३ कामापैकी २७ कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून त्यापैकी १६ कामे पूर्ण आहेत. उर्वरित ११ कामापैंकी २ कामे प्रगतीपथावर, ६ कामे निविदा स्तरावर व ३ कामे जागेच्या अडचणीमुळे अद्याप सुरु व्हायची आहेत. उर्वरित ६ कामांना अद्यापही पुणे महानगरपालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त नाही. नाहरकत दाखला प्राप्त झाल्यानंतर नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेकरिता जिल्हानियोजन समिती पुणे यांना सादर करण्याचे नियोजन आहे.

(३) लागू नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील भिवंडी - कल्याण - शीळ रस्ता रुंदीकरणाच्या कामाबाबत**

**(४०) ५४८१८ (२४-०८-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी - कल्याण - शीळ रस्ता रुंदीकरणाचे काम एमएमआरडीए व रस्ते विकास महामंडळाकडून करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता रुंदीकरण कामास अद्याप पर्यंत सुरवात करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर काम कधी सुरु होणार आहे व कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-१०-२०१६) :** (१) होय. सदर काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यात येणार आहे.

(२) होय.

(३) दि. ३०.११.२०१५ रोजी मंत्रीमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास या प्रकल्पासाठी अंमलबजावणी यंत्रणा म्हणून मान्यता दिली असून त्यानुसार प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे. प्रकल्प आर्थिक दृष्ट्या सुसाध्य झाल्यास प्रशासकीय मान्यतेनंतर निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील भोलावडे-महुडेपर्यंत जाणारा रस्ता संपूर्ण झाडाझुडपांनी वेढला गेल्यामुळे प्रवाशांना प्रवास करणे त्रासदायक ठरत असल्याबाबत**

**(४१) ५५५४२ (२४-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील भोलावडे-महुडेपर्यंत जाणारा रस्ता संपूर्ण झाडाझुडपांनी वेढला गेल्यामुळे प्रवाशांना प्रवास करणे त्रासदायक ठरत असून यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाला रस्त्यालगत असलेली झाडेझुडपे काढून टाकण्यात यावी अशी मागणी वेळोवेळी ग्रामस्थांनी करुनही याकडे संबंधित विभाग दुर्लक्ष करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी रस्त्यालगतची झाडे छाटण्यास विलंब करणा-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही, ग्रामस्थांनी मागणी केल्याप्रमाणे सदरील झाडेझुडपे काढून टाकण्यात आलेली आहेत. रस्त्यावरुन वाहतुक सुरळीतपणे चालू आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कागल तालुक्यातील (जि.कोल्हापूर) कौलगे-म्हाकवे**
**पुलाचे कामाचा सर्व्हे करुन कामास सुरुवात न केल्याबाबत**

**(४२) ५७२२० (२४-०८-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कागल तालुक्यातील (जि.कोल्हापूर) कोलगे-म्हाकवे पुलाचे सर्व्हे होवून अनेक वर्षाचा कालावधी लोटला असून सदर पुलाच्या कामास सुरुवात करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच सदर पुलाच्या कामास निधी उभारुन पुलाचे काम लवकरात लवकर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०९-२०१६) :** (१) होय, विषयांकित पुलासाठी प्राथमिक सर्व्हेक्षण तीन वर्षापूर्वी करण्यात आले आहे.
(२) विषयांकित पुलासाठी भूसंपादन करण्याची आणि त्याकरीता शासन मंजूरी व निधी उपलब्धतेची आवश्यकता आहे.
(३) व (४) प्रश्नाधीन पूल हा जिल्हास्तरीय रस्त्यावरील असून सदर पूलाचे काम मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील टोलमाफी संदर्भात विचार करण्याकरीता सा.बां.विभागच्या**
**मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीला दिलेल्या मुदतवाढीबाबत**

**(४३) ५७२८३ (२४-०८-२०१६). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम),**

**श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर तसेच मुंबई शहराच्या सिमेवरील ५ टोल नाक्यांवरील टोलमाफी संदर्भात विचार करण्याकरीता सा.बां.विभागच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीला आतापर्यंत दोन वेळा मुदतवाढ देऊनही समितीने आपला अहवाल शासनास सपुर्द न केल्याचे पुन्हा एकदा मुदतवाढ दिल्याचे जाहिर करण्यात आले असल्याचे माहे जून, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत दोन वेळा दिलेल्या मुदतवाढीमध्ये मुख्य सचिवांनी काय काम केले व आवश्यकती सर्व माहिती उपलब्ध असतानाही त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याकरिता विलंब लागण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, मुंबईच्या पाच प्रवेशव्दारावरील टोलमधून पुढील वर्षात प्रकल्पाची मुळ किंमत खर्च २१०० कोटी रुपये वसूल होणार असल्याने सन २०२७ पर्यंत कंत्राटाची वाढवून दिलेली मुदत रद्द करण्याविषयी व या पाच टोल नाक्यांवर दिनांक ३ सप्टेंबर, २०२७ पर्यंत टोल वसुली चालू ठेवण्याचे कंत्राट रद्द करण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) त्यानुसार मुंबईच्या पाच प्रवेशव्दारावरील टोल रद्द करणेबाबत, सन २०२७ पर्यंत टोल वसूलीचे कंत्राट रद्द करणेविषयी शासनाने काय निर्णय घेतला व घेण्यात येत आहे,

(५) तसेच संबंधित मुख्य सचिवांनी सदर अहवाल वेळेत सादर न केल्याबद्दल शासनाने काही स्पष्टीकरण मागितले होते काय, स्पष्टीकरणामध्ये कोणती कारणे नमूद केली आहेत, सध्या देण्यात आलेली तिसरी मुदतवाढ ही अंतिम ठरण्याकरिता शासन मुख्य सचिवांना अहवाल तयार करण्याकरिता कोणते अतिरिक्त सहकार्य करणार आहे, नसल्यास का नाही ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०१६) :** (१) नाही.

(२) समितीतील सदस्य अधिका-यांची सेवानिवृत्ती, बदल्या व प्रकरणातील आर्थिक व कायदेशीर गुंतागूंत यामुळे विलंब झाला आहे.

(३) होय.

(४) व (५) सा.बां. विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीला दि.३०.०४.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल शासनास दि.२८.०४.२०१६ रोजी सादर केला असून समितीचा अहवाल व शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत.

---

**मौजे सोनई, ता.नेवासा, जि.अहमदनगर येथील रस्त्याच्या दुरावस्थेबाबत**

**(४४) ५८४८९ (२४-०८-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सोनई (ता.नेवासा, जि.अहमदनगर) येथील तोरणा हॉटेल ते अनारसी वस्ती या रस्त्याची दुरावस्था झाली असून सदर रस्त्याचे डांबरीकरण अपूर्ण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापुढील रस्त्यावर बारा टायरचा कंटेनर व आयशर टेपो उलटून मोठा अपघात झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरण न करता शासनाच्या निधीचा दुरुपयोगा करणा-यांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनूसार पूढे कोणती कारवाई करणार आहे वा करित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

ताहराबाद-राहुरी उंबरे ब्राम्हणी सोनई घोडेगाव चांदा कौठा फत्तेपूर देवगाव कुकाणा रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास आराखड्यानुसार रामा ६६ दर्जाचा असून एकूण लांबी ६५.७०० किमी आहे. रस्ता डांबरी पृष्ठभागाचा आहे.

या लांबीपैकी वंजारवाडी नेवासा तालुका सरहद्द सोनई घोडेगाव या दरम्यानची लांबी १२.६०० किमी असून या लांबीमध्ये तोरणा हॉटेल सा.क्र.३५/४०० ते अनारसे वस्ती सा.क्र.३६/२०० ही लांबी समाविष्ट आहे. या लांबीत आवश्यक ठिकाणी दुरुस्ती करण्यात आली आहे. रस्ता वाहतुकीस योग्य आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने टोलनाक्यावरील वाहनांची गर्दी कमी करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक टॅगिंग टोल नाके करण्याबाबत**

**(४५) ५८९१० (२४-०८-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने टोलनाक्यावरील वाहनांची गर्दी कमी करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक टॅगिंग टोल नाके करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्याच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याची टोलवसूल करण्याची पध्दती जूनाट व वेळ काढूपणाची असल्याने टोल नाक्यावर हजारो वाहनांच्या रांगा लागत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ई-टॅगिंग सिस्टीमची अंमलबजावणी राज्यातील टोल नाक्यावर लवकरात लवकर करण्यात येणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०९-२०१६) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) राज्यात भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या पथकर स्थानकांवर एप्रिल, २०१६ पासून एका मार्गिकेसाठी ई-टॅग प्रणालीचा वापर सुरु असून, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील मुंबईतील पाच प्रवेश पथकर स्थानके, राजीव गांधी सागरी सेतू व मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर ई-टॅग प्रणाली वापरण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वांद्रे (मुंबई) येथील शासकीय वसाहतीचा पुनर्विकास करण्याबाबत**

**(४६) ६०३७९ (२४-०८-२०१६). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथील शासकीय वसाहतीचा पुनर्विकास करण्याबाबतची योजना या शासनाने रद्द केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वसाहतीच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी सल्लागाराच्या नेमणूकीसाठी निविदा मागविण्याबाबतचा निर्णयही राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सल्लागाराकडून पुनर्विकासाबाबतचा नवीन अहवाल शासनास प्राप्त होण्यासाठी किती कालावधी सल्लागारास देण्यात आला आहे व शासकीय वसाहती असलेल्या ९५ एकर जमीनीवर किती घरे अधिकारी व कर्मचा-यांसाठी वर्गनिहाय बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०९-२०१६) :**(१) होय.

यापूर्वीची वसाहतीचे तीन भाग करुन पुनर्विकास करण्याची योजना शासनाने रद्द केली आहे.

(२) होय.

(३) सद्यस्थितीत शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व) व नजिकच्या परिसराचे टोपोग्राफीक सर्व्हे करुन सल्लागारांना आवश्यक असलेला डेटा गोळा करण्यात येत आहे. बांद्रा शासकीय वसाहतीचा पुनर्विकासाचा आराखडा तयार करण्यासाठी जागतिक दर्जाच्या सल्लागारांचे मार्गदर्शन प्राप्त करुन घेण्यासाठी विदेश सरकारांशी संपर्क साधून सामंजस्य कराराच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय सल्लागारांच्या सेवा व मार्गदर्शन प्राप्त करुन ही प्रक्रिया नोव्हेंबर, २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**मौजे पाल (ता.कराड, जि.सातारा) येथील पाल काशिळ ते राष्ट्रीय मार्ग क्रमांक ४ व प्रमुख प्रजिमार्ग वरील पुलाची उंची वाढविण्याची मागणी**

**(४७) ६०५६९ (२४-०८-२०१६). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाल (ता.कराड, जि.सातारा) येथील पाल काशिळ ते राष्ट्रीय मार्ग क्रमांक ४ व प्रमुख जिल्हा मार्गावरील पुलाची उंची वाढविणेकरीता नाबार्ड २२ अंतर्गत समावेश करुन निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे कराड येथील लोकप्रतिनिधीनी दिनांक २५ मे, २०१६ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०९-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) विषयांकित पूलाचे काम नाबार्ड अंतर्गत निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारातील येणा-या महामार्गावर प्रसाधनगृह नसल्याने प्रवाशांची विषेशत: महिलांची खूप गैरसोय होत असल्याबाबत**

**(४८) ६३२३७ (२४-०८-२०१६). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारात येणाऱ्या महामार्गावर प्रसाधनगृह नसल्याने प्रवाशांची विषेशत: महिलांची खूप गैरसोय होत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्येक १०० किमीमागे १ प्रसाधनगृह बांधण्यात येणार असल्याचे मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी घोषित केल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आतापर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत किती प्रसाधन गृहे बांधण्यात आली आहेत,
(४) तसेच अशी किती प्रसाधन गृहे बांधण्यात येणार असून त्यासाठी निधीचे कशाप्रकारे नियोजन करण्यात आले आहे व प्रसाधन गृहे उपलब्ध होण्यासाठी किती कालावधी अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१०-२०१६) :** (१) होय.

(२) सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये राज्यातील राज्य महामार्गावर दर १०० किलोमीटर अंतरावर १ या प्रमाणात महिलांसाठी स्वच्छतागृह बांधणेबाबत मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांनी घोषणा केली आहे.

(३) व (४) प्रस्तूत प्रकरणी दि.२२.६.२०१६ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## परभणी जिल्हयातील शेतक-यांचे रेशीम शेड साहित्य व तुती लागवडीच्या प्रलंबित अनुदानाबाबत

**(४९) ६३४३७ (२२-०८-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील गेल्या दोन वर्षापासून शेतक-यांचे रेशीम शेड साहित्य व तुती लागवडीच्या प्रलंबित अनुदानाच्या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिनांक ३/६/२०१६ रोजी पासून परभणी जिल्हा रेशीम कार्यालयासमोर मुक्काम ठोको आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संघटनेच्या कोणकोणत्या मागण्या आहेत व त्याचा अद्याप निर्णय न होण्याची करणे काय आहेत,

(३) असल्यास,संघटनेच्या मागण्यासंदर्भात लवकर निर्णय घेण्यासाठी शासनामार्फत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्य: स्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (२०-१०-२०१६) :**(१) होय.

(२) स्वाभिमानी शेतकरी संघटनेने त्यांचे दि.३०.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हयातील रेशीम उत्पादक शेतकरी, शेड बांधणे, साहित्य व लागवडीसाठीच्या अनुदानापासून वंचित आहेत, अनुदान मिळण्याबाबतची मागणी केली आहे.

केंद्र पुरस्कृत सीडीपी योजनेंतर्गत सन २०१४-१५ पर्यंत किटक संगोपनगृह उभारणी, तुती लागवड व साहित्य पुरवठासाठी अनुदानाची योजना होती. तथापि केंद्रीय रेशीम मंडळ (भारत सरकार) यांचे दि.२३.०३.२०१५ च्या पत्रानुसार सन २०१५-१६ पासून ही योजना बंद झालेली आहे.

राष्ट्रीय कृषि विकास अंतर्गत किटक संगोपनगृहाबाबतचा शासन निर्णय दि.२९ जून, २०१६ व समुहामध्ये तुती लागवडीबाबतच्या दि.१५ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार परभणी कार्यालयाने योजनेतील निकष पूर्ण करणा-या पात्र लाभार्थ्यांना अनुदान दिले आहे.

परभणी जिल्ह्यातील एकूण ५४ लाभार्थ्यांचे किटक संगोपनगृह उभारणी तसेच ७५ लाभार्थ्यांचे तुती लागवडीचे अनुदान प्रस्तावित होते. त्यापैकी २९ लाभार्थ्यांना किटक संगोपनगृहाचे व ५३ लाभार्थ्यांचे तुती लागवडीचे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहेत. किटक संगोपनगृह प्रस्तावापैकी २५ लाभार्थ्यांची तुती लागवड ही सन २०१४-१५ मधील व त्यापूर्वीची असल्याने शासन निर्णय दि.२९.०६.२०१६ मधील तरतूदीचे निकष पूर्ण करत नसल्याने अनुदान प्रलंबित आहे. तसेच तुती लागवडीच्या प्रस्तावापैकी २२ लाभार्थी यांची लागवड ही शासन निर्णय दि.१५ जुलै, २०१५ नंतर करण्यात आली असून समुहाबाहेर असल्याने अनुदान अनुज्ञेय नाही. रेशीम उद्योगाचा विस्तार व विकास परिणामकारक तसेच एकात्मिकरित्या होण्यासाठी समुहपध्दतीचा अवलंब करण्याच्या मार्गदर्शक सुचना तसेच राष्ट्रीय कृषि विकास कार्यक्रमांतर्गत किटक संगोपनगृह बांधकाम अनुदानाच्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने प्रलंबित लाभार्थ्यांच्या अनुदानाचा प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

---

## नाशिक येथील द्याने-नामपूर-ताहाराबाद रस्ता हा अत्यंत रहदारीचा असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गैरकारभारामुळे अत्यंत धोकादायक बनल्याबाबत

**(५०) ६३९४८ (२४-०८-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील द्याने-नामपूर-ताहाराबाद रस्ता हा अत्यंत रहदारीचा असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गैरकारभारामुळे अत्यंत धोकादायक बनला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेकांना आपला जीव गमवावा लागला असून अनेक दुचाकीस्वारांना अपंगत्व आले असल्याचे माहे जून, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन त्वरित निर्णय घेऊन सदर रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत कार्यवाही करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०९-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

सदर रस्त्यावर ताहराबाद ते नामपूर या लांबीत माहे जून ते ऑगस्ट, २०१६ दरम्यान झालेले अपघात हे चालकांच्या चुकीमुळे झाले आहेत असे पोलीस स्टेशन जामखेडा यांच्या कार्यालयातील नोंदीवरुन दिसून येते.

(३) प्रश्नाधीन रस्त्यावरील ताहराबाद ते नामपूर या २३.८ किमी लांबीपैकी १३.८ किमी लांबीचा डांबरी पृष्ठभाग वाहतुकीस योग्य आहे. उर्वरीत १०.०० किमी लांबीपैकी काही लांबीत रुंदीकरण, खडीकरण व डांबरीकरणाचे काम झालेले आहे.

उर्वरित लांबीत मंजूरी, निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार आवश्यक दुरुस्तीची व सुधारणेची कामे करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.